# आरोग्य सेवा आयुक्तालय (महाराष्ट्र राज्य)

"आरोग्य भवन" सेंट जॉर्जेस रुग्णालय, आवर, पी.डिमेलो रोड, मुंबई - ४०० ००१

| कार्यालय | दुरध्वनी | Website : http://maha-arogya.gov.in |
|---|---|---|
| संचालक (वैयक्तिक) | २२६२१०३१-३६ | Email : dhs_2005@rediffmail.com |
| सहसंचालक (रुग्णालये-राज्यस्तर) | २२६२१००६ | Email : jdhs03@gmail.com |
| सहसंचालक (प्राआकेंद्र-जिपस्तर) | २२६११४७१ | Fax No. 022-22621034 / 22620234 (DHS) ९६८४८ |


| | |
|---|---|
| तात्काळ/ कालमर्यादा. | क्र.आसेआ/कक्ष-३/टे-१/गुनहोनि/खाते/संलग्न/ /२४<br>दिनांक:- १० सप्टेंबर, २०२४ |

प्रति,

१) जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय ( सर्व )

२) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद ( सर्व )

३) वैद्यकीय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका ( सर्व )

४) मुख्य आरोग्य अधिकारी, कटक मंडळे ( सर्व )

**विषय - बॉम्बे नर्सिंग होम ॲक्ट अंतर्गत खाजगी नर्सिंग होम नोंदणी फी साठी बँक खाते ( Account Number ) संलग्न करणेबाबत.**

**संदर्भ - मा. आयुक्त महोदयांनी दिलेल्या सूचना दि. १० सप्टेंबर, २०२४**

बॉम्बे नर्सिंग होम ॲक्ट अंतर्गत खाजगी नर्सिंग होम्सचे नोंदणी व पुनर्नोंदणीचे कार्य प्रभावी रित्या होण्याच्या दृष्टीने Nursing Home Registration ही ऑनलाईन संगणक प्रणाली विकसित करण्यात आली आहे. सदर संगणक प्रणाली संपूर्ण राज्यात दिनांक १५ ऑगस्ट, २०२४ पासून https://maha-mnhregistration.co.in या ऑनलाईन पोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात आली असून, राज्यातील सर्व खाजगी नर्सिंग होमची नोंदणी या पोर्टलवर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यानुषंगाने सदर पोर्टलवर खाजगी नर्सिंग होमच्या नोंदणीद्वारे प्राप्त होणारी फी ही संबंधितांच्या बँक खात्यामध्ये जमा होणे आवश्यक आहे.

तरी आपल्या अधिनस्त खाजगी नर्सिंग होमच्या नोंदणीद्वारे जमा होत असलेली नोदणी फी ची रक्कम ज्या बँक खात्यामध्ये जमा होत आहे. त्या बँक खात्याचा क्रमांक (Account Number ), तसेच उपलब्ध होत असलेल्या सर्टिफिकेटवर आपणांस ( महानगर पालिका, नगर परिषद, जिल्हा परिषद, कटक मंडळ ) अपेक्षित असलेले परिचय चिन्ह ( Logo ) चा नमूना त्वरीत आयुक्तालयास सादर करावा. जेणेकरुन सदर बँक खाते ( Account Number ) व सुधारित सर्टिफिकेटवर अपेक्षित परिचय चिन्ह ( Logo ) ऑनलाईन पोर्टलमध्ये तातडीने समाविष्ट करण्यात येईल.

sd/-

( डॉ.सुनिता गोल्हाईत )
सह संचालक, आरोग्य सेवा
रुग्णालये ( राज्यस्तर ) मुंबई.

प्रत - उपसंचालक, आरोग्य सेवा, परिमंडळे ( सर्व ) यांना माहिती तथा योग्य कार्यवाहीसाठी.